**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात सर्वत्र ढोलताशाच्या गजरात गणरायाचं आगमन, परंपरेला आधुनिकतेची जोड देत गणेशोत्सवाच्या चैतन्यपर्वाला प्रारंभ

- पीएम स्वनिधी योजनेच्या मुदतवाढीला आणि अतिरीक्त कर्ज द्यायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता

- वैष्णोदेवी मंदिर मार्गावर कटरा परिसरात झालेल्या भूस्खलनात आत्तापर्यंत ३० जणांचा मृत्यू

- निर्यात वाढवण्यासाठी ४० देशांमध्ये भारतीय वस्तूंचा प्रचार-प्रसार करायचा भारताचा निर्णय

- **आणि**
  आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारताच्या महिला संघानं पटकावलं सुवर्णपदक

**<><><><><>**

१० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला आजपासून देशभरात सुरुवात झाली. घरोघरी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने गणरायाची प्रतिष्ठापना झाली. राज्यात सर्वत्र पारंपरिक पद्धतीनं स्थानिक वैशिष्ट्यांसह आणि नवनवीन कल्पना राबवून मंगलमूर्तींचा हा उत्सव साजरा होत आहे. यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी (१:०८ मिनिटं)***

ढोलताशांचा गजर आणि गणपतीबाप्पा मोरयाच्या जयघोषात आज मुंबईसह राज्याच्या विविध भागांत गणपतीबाप्पाचं आगमन झालं.

मुंबईत आज सुमारे बारा हजार सार्वजनिक, तर सव्वा लाख घरगुती गणपतींची प्रतिष्ठापना झाली. गणेशोत्सव सुरक्षितरीत्या साजरा व्हावा, यासाठी प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे. मेट्रो, बेस्ट तर्फे भाविकांसाठी विशेष सोय करण्यात आली आहे.

पुण्यातही आज पारंपरिक उत्साहानं मानाच्या पाच गणपतींसह इतर विविध गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना झाली. गणेशोत्सवाची आरास पाहण्यासाठी निघालेल्या भाविकांच्या सोयीसाठी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो स्थानकांवरुन उशिरापर्यंत मेट्रो सेवा सुरु राहणार आहे. गणेशोत्सवानिमित्त शहरात विविध कार्यक्रमांची रेलचेल आहे.

नागपूरवासीयांचं आराध्य दैवत टेकडी गणेशाचीही आज भक्तिपूर्ण वातावरणात प्रतिष्ठापना झाली.

नवी दिल्ली इथल्या महाराष्ट्र परिचय केंद्रात गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. कर्नाटक, तेलंगणसह इतर राज्यांमध्येही गणेशोत्सवाचा उत्साह आहे.

जनसामान्यांबरोबरच विविध क्षेत्रातले नामवंत मान्यवर उत्साहाने या सणाचा आनंद लुटत आहेत.

परंपरा जपण्यासोबतच आधुनिकतेची जोड देणं आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर सर्वत्र भर दिला जात आहे.

**<><><><><>**

पीएम स्वनिधी अर्थात प्रधानमंत्री पथविक्रेते आत्मनिर्भर निधी योजनेच्या पुनर्रचनेला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. त्यानुसार पहिल्यांदा कर्ज घेणाऱ्यांना १० ऐवजी १५ हजार आणि दुसऱ्यांदा कर्ज घेणाऱ्यांना २० हजार ऐवजी २५ हजार रुपये कर्ज मिळेल. तिसऱ्यांदा कर्ज घेणाऱ्यांना मात्र ५० हजार रुपयेच कर्ज दिलं जाईल. या पुनर्रचनेमुळे ५० लाख नव्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळेल. आणखी अनेक शहरं आणि गावांमध्ये ही योजना राबवली जाणार आहे. या योजनेअंतर्गत कर्ज वितरणाची मुदत आता ३१ मार्च २०३० पर्यंत वाढवली आहे. या योजनेसाठी ७ हजार ३३२ कोटी रुपये इतकी तरतूद आहे.

२०३० मधल्या राष्ट्रकुल स्पर्धा भारतात आयोजित करण्यासाठी दावा दाखल करायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. अमदाबादमध्ये या स्पर्धांचं आयोजन करण्याचा प्रस्ताव आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीनं गुजरातमध्ये कच्छपर्यंत नवा रेल्वेमार्ग आणि कर्नाटक, तेलंगणा, बिहार आणि आसाममधल्या रे◌ेल्वेमार्गांच्या बहुपदरीकरणालाही मंजुरी दिली.

<><><><>

भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर अतिरिक्त शुल्क लादण्याच्या अमेरिकेच्या निर्णयानंतर भारतानं ४० इतर देशांमध्ये भारतीय वस्तूंचा प्रचार-प्रसार करायचा निर्णय घेतला आहे. ब्रिटन, स्पेन, फ्रान्स, जर्मनी, इटली, रशिया, कॅनडा, तुर्किये, ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांचा यात समावेश आहे. या देशांमध्ये व्यापार मेळावे, खरेदीदार-विक्रेते यांच्या बैठका, विभिन्न उद्योगांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या मोहिमा राबवल्या जाणार आहेत. यासंदर्भात केंद्रीय वाणिज्य मंत्रालय या आठवड्यात निर्यातदारांची बैठक घेणार आहे. यात अधिकाधिक बाजारपेठांमध्ये निर्यात वाढवण्यावर आणि अधिकाधिक वस्तू निर्यातीसाठी उपलब्ध करण्यावर भर दिला जाणार आहे.

<><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये वैष्णोदेवी मंदिर मार्गावर कटरा परिसरात झालेल्या भूस्खलनात आत्तापर्यंत ३० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी दिल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. याठिकाणी अजूनही मदत आणि बचावकार्य सुरू आहे. जम्मूमध्ये २४ तासात ३८० मिलीमीटर पावसाची नोंद झाली. गेल्या १०० हून अधिक वर्षांत २४ तासांत झालेला हा विक्रमी पाऊस आहे. दोडा जिल्ह्यातही पावसाशी निगडीत दुर्घटनांमध्ये ४ जणांचा मृत्यू झाला आहे.

या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर

अब्दुल्ला यांच्याशी फोनवरून संवाद साधला आणि परिस्थितीची माहिती घेतली. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी आज कटरा इथल्या रुग्णालयाला भेट दिली आणि या दुर्घटनेतल्या जखमींशी संवाद साधला. या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्याची घोषणा सिन्हा यांनी केली.

हिमाचल प्रदेशातही ३ दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसानं चंबा, कांग्रा आणि कुल्लू जिल्ह्यातलं जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक ठिकाणी दरड कोसळल्यानं राज्यभरातल्या शेकडो रस्त्यांवरची वाहतूक बंद पडली आहे. पठाणकोट-चंबा राष्ट्रीय महामार्गही बंद पडल्यानं हजारो वाहनं या मार्गावर तसंच मणी महेश यात्रेच्या मार्गावर अडकून पडली आहे.

**<><><><><>**

जम्मूतल्या मुसळधार पावसामुळं उत्तर रेल्वेनं ४५ गाड्या रद्द केल्या असून २५ गाडया मध्ये थांबवल्या आहेत. प्रवाशांसाठी जम्मू तावी, श्री माता वैष्णोदेवी कटरा, पठाणकोट आणि नवी दिल्ली रेल्वे स्थानकांवर मदत केंद्रं स्थापन करण्यात आली असल्याचं, उत्तर रेल्वेनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात भामरागड इथं कोपर्शी गावाजवळ आज पोलिसांशी झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. यात तीन महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. नक्षलवादी काही घातपात करायच्या तयारीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती, त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी या भागात मोहीम सुरू केली होती. आज नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबाराच्या प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चौघेजण ठार झाले. आठ तास ही चकमक चालली. पोलिसांनी घटनास्थळावरून काही शस्त्रं जप्त केली आहेत. मृत नक्षलवाद्यांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे.

<><><><><>

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज ३० नक्षलवाद्यांनी पोलीस आणि केंद्रीय सशस्त्र दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केलं. त्यांच्यापैकी २० जणांवर एकंदर ८१ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात वसई तालुक्यातल्या नारंगी रोडजवळ चार मजली इमारतीचा काही भाग जवळच्या चाळीवर कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला. आतापर्यंत अकरा जणांना बाहेर काढण्यात आलं असून आणखी ६ ते ७ जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता आहे.

<><><><><>

कझाकस्तान इथं सुरू असलेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत, महिलांमधे ५० मीटर थ्री पोझिशन सांघिक प्रकारात सिफ्त कौर सर्मा, आशी चौक्सी, आणि अंजुम मौदगिल यांनी सुवर्णपदक पटकावलं.

पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्टलमधे भारतीय नेमबाज अनीश भनवाला याचं सुवर्णपदक अवघ्या एका गुणानं हुकलं, आणि त्याला रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. चीनच्या सू लियाबोफान यानं ३६ गुणांसह सुवर्णपदक पटकावलं, तर दक्षिण कोरियाच्या स्पर्धकानं कांस्यपदक मिळवलं. याच प्रकारात सांघिक स्पर्धेतही भारतानं रौप्य पदक पटकावलं. दक्षिण कोरियानं सुवर्ण, तर चाननं कांस्य पदक मिळवलं.

<><><><><>

अफगाणिस्तानात काबूलजवळच्या अरघंडी इथं आज सकाळी एक बस उलटून झालेल्या अपघातात २५ जण ठार तर २७ जण जखमी झाले. कंधार ते काबूल महामार्गावरची घटना चालकाच्या बेपर्वाईमुळे झाल्याचं अंतर्गत मंत्रालयाचे प्रवक्ते अब्दुल मतिन कानी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आहे. विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती विपुल पंचोली यांचीही नेमणूक सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे पुढचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या नावाची शिफारस न्यायवृंदानं केली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून जपान आणि चीनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्याबरोबर ते १५व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील. चीनमध्ये, प्रधानमंत्री ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या राष्ट्रप्रमुखांच्या पंचविसाव्या बैठकीत सहभागी होणार आहेत.

//<><><><><>//